# दैनिक महामेट्रो


३४ हजार जणांना टेली मानस द्वारे समुपदेशन

पान २ ▸




वर्ष ४ रे : अंक : २ पुणे, बुधवार, १७ डिसेंबर २०२५ पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.4. ISSUE : 2 Pune, Wednesday, 17 December 2025 Pages : 4 PRICE : 3.00


# मिनी महापालिका भ्रष्टाचाराचे कुरण?

## पंधरा क्षेत्रीय कार्यालयात विकासकामात अनियमितता; अधिकारी व ठेकेदारांचे संगणमत

## एफडी व पत दाखले बनावट; खासगी बँकेतील अधिका-यांचे काळेबैरे

**पुणे, दि. १६ :** येरवडा क्षेत्रीय कार्यालयात विकास कामांच्या निविदा मिळाल्यानंतर महा पालिकेकडे बँकेच्या बनावट मुदत ठेवी पावत्या (एफडीआर) सादर करून फसवणूक केल्याची नुकतीच बाब पुढे आली आहे. एका ठेकेदाराने विकास कामे मिळविण्यासाठी आर्थिक पात्रता सिद्ध करण्यासाठी एका बड्या खाजगी बँकेचे बनावट पत दाखला (सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट) देऊन महपालिका प्रशासन आणि बँकेची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.महपालिका अधिकारी आणि अभियंत्यांकडून ठेकेदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची बारकाईने पडताळणी होत नसल्याने बनावट कागदपत्रांचा सुळसुळाट वाढला आहे . हाच प्रकार इतर चौदा क्षेत्रीय कार्यालयात घडत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत. त्यामुळे मिनी महापालिका समजल्या जाणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयात प्रशासन राज जोरात सुरू आहे .



विकास कामांच्या निविदा मिळाल्यानंतर एका या ठेकेदाराने काही महिन्यांपूर्वी वीस लाख रुपयांच्या युनियन बँकेच्या बनावट एफडीआर पालिकेकडे जमा केले होते.याप्रकरणी हे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे तक्रार केली होती.चौकशीत ठेकेदार दोषी आढळल्याने अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी ठेकेदाराला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करून त्याच्या पाच कामांच्या बायना रक्कम जप्त करणे आणि फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

ठेकेदारावर कारवाईची घटना ताजी असताना आणखीन एका ठेकेदाराने निविदा मिळविण्यासाठी अर्ज भरताना खाजगी बँकेचे वीस लाख रुपयांचे बनावट सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट जोडल्याचा प्रकार समोर आला आहे. माहिती अधिकारी कार्यकर्ते अकबर खान यांनी महापालिका आयुक्तांकडे तक्रार करून सॉल्व्हन्सी सर्टिफिकेटची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

> ठेका एकाचा काम करतो दुसरा संबंधित ठेकेदाराचा परवाना लकशमी एंटरप्रायझेस त्या नावाने असून तब्बल दीड कोटीची विकास कामे भलताच ठेकेदार करीत आहे. त्यामुळे काळ्या यादीची व गुन्हा दाखल होण्याची भिती संबंधित ठेकेदाराला नाही, अशा आविर्भावात तो क्षेत्रीय कार्यालयात वावरत आहे

संबंधित ठेकेदाराला येरवडा क्षेत्रीय कार्यालयात २०२५–२६ आर्थिक वर्षात तब्बल ३४ कामे मिळाली आहेत. जवळपास सर्वच कामे ३० ते ४७ टक्के कमी दराने मिळविले आहे.निविदा अर्ज भरताना आवश्यक कागदपत्रांसोबत आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे आणि त्यांच्या कर्जाची परतफेड करण्याची क्षमता दाखविण्यासाठी सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट अनिवार्य असते.हे दस्तऐवज सरकारी आणि व्यावसायिक कामांमध्ये, जसे की मोठ्या आर्थिक व्यवहारांसाठी, कंत्राटांसाठी अर्ज करताना किंवा कर्ज घेताना आवश्यक असते.

मात्र संबंधित ठेकेदाराने आयसीआयसीआय बँकेचे बनावट सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट जोडण्याचा प्रकार आला आहे.याबाबत मटाचे प्रतिनिधीने संबंधित बँकेच्या विश्रांतवाडी शाखेचे व्यवस्थापक यांच्याकडे विचारणा केल्यावर त्यांनी त्रयस्थ व्यक्तीला माहिती देऊ शकत नसल्याचे सांगून माहिती देण्यास टाळाटाळ केली.

> चालू आर्थिक वर्षात संबंधित ठेकेदाराला ३४ विकासाची कामे मिळाली आहे. निविदा मिळवण्यासाठी ठेकेदाराने बनावट सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट जोडण्याचा संशय आहे.त्यामुळे महापालिका आयुक्तांना तक्रार करून सॉल्व्हन्सी सर्टिफिकेटची चौकशीची मागणी केली आहे.यामध्ये क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येते याबाबत मुख्यमंत्री कार्यालयात तक्रार अर्ज केले आहे"
>
> - अकबर खान, माहिती अधिकार कार्यकर्ता

> सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट जोडल्याचा तक्रारीच्या अनुषंगाने कागदपत्रांची नव्याने पडताळणी सुरु करणार आहे. तसेच विविध निविदांना एकच मुदत ठेव जोडल्याची पाहणी करणार आहे."
>
> - राजेश गुर्रम, सहायक आयुक्त

# पुणे-लोहगाव आंतरराष्ट्रीय विमानतळ रस्ता जागतिक दर्जाचा होणार

**पुणे, दि. १६ :** पुणे लोहगाव आंतरराष्ट्रीय विमानतळ रस्ता जागतिक दर्जाचा होणार आहे. नागपूरचाळ ते विमानतळ प्रवेशद्वार पर्यंत आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुशोभिकरण केले जाणार आहे. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) फंडातून रस्त्याचे सुशोभिकरण होणार आहे.त्यासाठी रस्त्याची रुंदी २४ मीटर होणार आहे. सुशोभिकरण करताना पुण्याच्या कलेचे व सांस्कृतिक प्रतिकेतेचे दर्शन घडणार आहे.पादचाऱ्यांसाठी प्रशस्त पदपथ ,प्रवाशी आणि नागरिकांना बसण्यासाठी उत्तम बाकांची व्यवस्था,आकर्षक कारंजे, उत्कृष्ट दर्जाची विद्युत रोषणाई आणि वाहतुकीचे व्यवस्थापन तयार केले जाणार आहे.यामुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे. त्यामुळे पर्यटकांचे आकर्षण वाढणार आहे.



लोहगाव परिसरात पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे.मागील दशकापासून विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या लाखांवर गेली आहे.प्रवाशांची आणि वाहनांची वर्दळ वाढल्याने विमानतळ रस्त्यावर प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.नागपूर चाळ ते विमानतळ पर्यंत रस्ता हवाई दलाचा आणि खाजगी मालकीची जमीन आहे.हवाई दलाकडून जागा ताब्यात मिळत नसल्याने गेल्या कित्येक वर्षांपासून रस्त्याचे रुंदीकरण रखडले आहे.दुसऱ्या बाजूला खाजगी जागा असल्याने महापालिकेला रस्ता रुंदीकरण करण्यात अडचणी येत होत्या.

केंद्रीय नागरी राज्य उड्डाणमंत्री व खासदार मुरलीधर मोहोळ यांनी विमानतळ रस्त्याचे रुंदीकरण आणि सुशोभिकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू केले . मोहोळ यांच्या प्रयत्नामुळे हवाई दलाने नागपूर चाळ पासून विमानतळ पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी मंजुरी दिली.तसेच खाजगी जागा मालकांनी रुंदीकरणाला परवानगी दिली.त्यामुळे नागपूर चाळ ते लोहगाव विमानतळ पर्यंत तीन किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

> नागपूर चाळ ते विमानतळ प्रवेशद्वार पर्यंत सद्यस्थितीत असणारा १२ मीटरचा रस्ता दुप्पट होऊन २४ मीटरचा होणार आहे. सीएसआर फंडातून तीन किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुशोभिकरण केले जाणार आहे. येत्या पंधरा दिवसांत कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.हवाई दलाने त्यांच्या ताब्यातील जागा उपलब्ध करून दिल्याने विमानतळ रस्ता प्रशस्त होणार आहे. केंद्रीय नागरी राज्य उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर होणाऱ्या सुशोभीकरणाचे सादरीकरण करण्यात आले आहे."
>
> - **अनिरुद्ध पावसकर ,**
> मुख्य अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका

> लोहगाव विमानतळ रस्ता हा शहरातील एक महत्वाचा रस्ता मानला जातो. शहराच्या सांस्कृतिक, पारंपरिक आणि भावनिक धारणा घडविण्यात रस्ते आणि परिसर महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे जागतिक दर्जाचे रस्ते,पादचारी मार्ग,शोभेची झाडे,आकर्षक कारंजे,विद्युत रोषणाई, प्रवाशी आणि नागरिकांना बसण्यासाठी सुंदर फर्निचर आसनव्यवस्था आणि वाहतूक नियमांचे व्यवस्थापन तयार केले जाणार आहे.एकूणच लोहगाव विमानतळाबाहेरील रस्ते आणि परिसराचे सुशोभिकरण आंतरराष्ट्रीय स्तराचे असणार आहे."
>
> - **उमेश वाकले ,** स्टुडिओ रूटस लॅण्डस्केप आणि आर्किटेक्ट

# ....पुन्हा घड्याळ व्हाया कमळ, तुतारी

## माजी नगरसेविका रेखा चंद्रकांत टिंगरे यांचा निवडणुकीसाठी प्रवास

**पुणे, दि. १६ :** महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर प्रत्येक वेळी थक्कातंत्राचा वापर करणारे माजी नगरसेविका यांचे पती चंद्रकांत टिंगरे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा( अजित पवार ) प्रवेश केला आहे. चंद्रकांत टिंगरे तांत्रिक अडचणीत न अडकता एका पक्षात राहायचे व विरोधी उमेदवारांचा प्रचार करायचे हा त्यांचा नेहमीचा अजेंडा राहिला आहे. त्यामुळे टिंगरे यांचे धक्कातंत्र येथील मतदारांसह राजकीय पक्षांना सर्वश्रुत आहे.



चंद्रकांत टिंगरे यांची पत्नी रेखा टिंगरे २०१२ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा तर्फे निवडून आल्या . तब्बल १४ हजार एवढ्या मताधिक्याने त्या निवडून आल्या होत्या. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत चंद्रकांत टिंगरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करून त्यांनी भाजपाचे उमेदवार जगदिश मुळीक यांचा प्रचार केला. त्यानंतर २०२२ मध्ये त्यांनी पुन्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी हातात तुतारी घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ( अजित पवार) उमेदवार सुनिल टिंगरे यांच्या विरोधात काम केले. आता ऐन महापालिका निवडणुकीत त्यांनी पुन्हा हातात घड्याळ बांधले आहे. त्यामुळे त्यांच्या धक्कातंत्राची जोरदार चर्चा प्रभागातच नाही तर वडगावशेरी मतदार संघात सुरू आहे.

# लक्ष्मीनगर पोलीस चौकीचे पोलीस ठाणे झाले पुढे काय !

## व्यसनाधीनता , बेरोजगारी कमी होऊन शिक्षणाचे प्रमाण वाढेल का ?



पुणे : शहरातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी चौक्यांचे पोलीस ठाणे होत आहेत. मात्र त्यामुळे गुन्हेगारी कमी होणार आहे का हा प्रश्न आहे . येथील व्यसनाधीनता, बेरोजगारी कमी झाली , शिक्षणाचे प्रमाण वाढले तरच गुन्हेगारी कमी होणार आहे. या ठिकाणी पोलीस स्टेशन होणे भूषण नव्हे तर येथील सर्वांचे अपयश आहे.

लक्ष्मीनगर मध्ये साधी मराठी शाळा नाही. गेनबा सोपानराव मोझे शाळा होती ती पाडली ,आठवीत ते दहावी ची मोझे शाळेचे टिंगरेनगरला स्थालांतर केले. ज्याठिकाणी शाळा नाही तेथील मुले गुन्हेगार होणार नाही तर काय होणार. लक्ष्मीनगर मध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण मोठे आहे. याठिकाणी गांजा सहज मिळतो. हातभट्टी दारूचे साम्राज्य आहे. बेरोजगारीमुळे अल्पवयीन मुले हातात कोयते घेऊन दहशत पसरवितात. अनेक स्वयंसेवी संस्था काम करतात मात्र त्यांचे प्रयत्न कमी पडतात. हीच स्थिती शहरातील अनेक वस्त्यांमध्ये आहे. त्यामुळे गुन्हेगारीच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. शरीराच्या एका भागाच्या आजारावरील उपचार सोडून दुसरीकडे इलाज केला जात आहे. त्यामुळे मुळातच शिक्षण, रोजगार , व्यसनमुक्ती यावर राज्य सरकार व महापालिकेने विचार केले तर पोलीस स्टेशनची निर्मिती करावी लागणार नाही. मात्र येथील लोकप्रतिनिधी , समाजसेवक आणि प्रशासन यांना दृष्टी ( व्हिजन ) नसल्यामुळे गेली कित्येक दशके लक्ष्मीनगर सारख्या वस्तीचा विकास होऊ शकला नाही. त्यामुळे या ठिकाणी पोलीस चौकी किंवा पोलीस स्टेशन होणे भूषण नव्हे तर येथील सर्वांचे अपयश आहे. मात्र हे येथील आजी व माजी नगरसेवक , समाजसेवक म्हणवणारे कार्यकर्ते , तेथील स्वयंसेवी संस्था , महापालिका प्रशासन ना पोलीस याना समजण्याच्या पलीकडचे आहे. कारण पोलीस स्टेशनच्या उद्धघाटनात हीच मंडळी पुढे मिरवणार आहेत. आपण येतील भाग्यविधाते कसे आहोत, आपल्यामुळे पोलीस चौकी कशी झाली हे सांगणार आहेत.

येथील समाजसेवक , आजी -माजी नगरसेवकांनी कधी लहानमुलांचे संस्कार वर्ग घेतले नाही, मुलांना कधी व्यवसायाचे स्किल दिले ना कधी व्यसनमुक्तीचे धडे दिले आहेत. काही पोलीस कर्मचाऱ्यांनी तर चक्क तेथील व्यसनाधीनतेला खतपाणी घातले. त्यांच्यामुळे गांजाचे साम्राज वाढले. याची दखल ना येथील नगरसेवकांनी घेतली ना वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घेतली. त्यामुळे येथील गुन्हेगारी फोफावली आणि पोलीस स्टेशनची निर्मिती झाली. यामुळे गुन्हेगारी कमी होईल कायदा व शांतता निर्माण होईल पण आधीचे प्रश्न सुटणार आहेत का ? येथील गुन्हेगार दुसरीकडे जातील तेथे साम्राज निर्माण करतील त्यामुळे पोलीस स्टेशन , चौक्या निर्माण करून उपयोग नाही तर मुळात येथील समस्यांचा विचार सामाजिक , आर्थिक व राजकीय स्तरावर सोडविले पाहिजे तरच येथील समस्या सुटणार आहेत. यासाठी नव्याने सर्व समाज घटकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवले पाहिजे असे येथील जाणकारांचे मत आहे.

संपादकीय....

# कैद्यांची लाईफ स्टाईल दारिद्र्रेषेच्यावर !

केंद्र सरकारने कुटुंबाच्या दारिद्र्रेषेच्या उत्पन्नाची अट ठेवली आहे. एखाद्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ५८ हजाराच्या आत असेल तर ते कुटुंब दारिद्र्रेषेच्या आत (बीपीएल) समजले जाते. जर त्याचे उत्पन्न ५९ हजार झाले तरी ते कुटुंब दारिद्र्रेषेच्यावर (एपीएल) गणले जाते. या निकषांचा विचार केला तर एखाद्या कैद्याला कारागृहात किती खर्च होतो याचा हिशोब केला तर तो ६२ हजारापेक्षा अधिक होतो. एखादा कैदी कारागृहात काम करीत असल्यास त्याचे उत्पन्न वीस ते पंचवीस हजाराच्या घरात जाते. यासह दरमहा काही कैद्यांना मनिऑर्डर सुद्धा नियमित येत असतात. या सर्वांचा विचार केला तर एका कैद्याचा कारागृहातील खर्च लाखाच्यावर जातो. याचा अर्थ कैद्याची कारागृहातील लाइफ स्टाईल दारिद्र्रेषेच्यावरील कुटुंबापेक्षा कमी नसते. केंद्र सरकारने देशातील एखाद्या कुटुंबाचे उत्पन्न ५८ हजारापेक्षा कमी असेल तर त्या कुटुंबाला दारिद्र्रेषेखाली (बीपीएल) म्हणून समजले जाते. कुटुंबाच्या उत्पन्नात हजार ते दोन हजाराची भर पडली तर ते कुटुंब दारिद्र्रेषेच्या वर येते. हे उत्पन्न हास्यापद असले तरी सरकारचे निकष आता तरी बदलता येणार नाही. त्याच वेळी राज्यातील कारागृहातील एका कैद्यावर सरकारचा होणारा खर्च हा दारिद्र्रेषेच्या वरील कुटुंबाच्या उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे वास्तव आहे. कारागृहात कैद्यांना सकाळी दुध, अंडी, चहा, न्याहरी, सकाळी दहा वाजता व चार वाजता जेवण दिले जाते याचा खर्च प्रत्येकी कैदी प्रमाणे १३० ते १४० रूपये होतो. यासह ते वापरत असलेले पाणी व वीजेचा वापर याचा विचार केला तर तो खर्च तीस ते चाळीस रूपयांपर्यंत जातो. याचा अर्थ प्रत्येक कैद्याला दिवसाला १६० ते १७० रुपये खर्च येतो. हा खर्च साहजिकच साठ हजारापेक्षा अधिक होतो. कारागृहात काम करणाऱ्या कैद्यांना कुशल (७२ रुपये), अर्धकुशल (६५ रूपये) तर अकुशल (५५ रूपये) पगार दिला जातो. या पगाराचा विचार केला तर वर्षभरात कैदी वीस हजारापेक्षा अधिक रूपये कमवतात. त्यानंतर अनेक कैद्यांना दरमहा त्यांचे नातेवाईक व मित्रमंडळी नियमित मनीऑर्डर करतात. या सर्व पैशांची गोळाबेरीज केली तर एक कैदी वर्षाला एक लाखापेक्षा अधिक खर्च करू शकतात. याचा अर्थ त्यांची लाइफ स्टाईल ही दारिद्र्रेषेच्या वरील कुटुंबासारखी असते. त्यामुळे बाहेरच्या जगापेक्षा कारागृहच बरे असे कैद्यांना वाटत नसेल तर नवलच म्हणावे लागेल.

## एका मनोरुग्णावर दैनंदिन तीनशे रूपयापेक्षा अधिक खर्च

येरवडा मनोरूग्णालयातील एका मनोरुग्णांचा दैनंदिन खर्च हा तीनशे रूपयापेक्षा अधिक आहे. रुग्णाला अधिक पौष्टीक अन्नपदार्थ, औषधोपचारांसह विविध उपचार पद्धती, मनोविकार तज्ज्ञांपासून ते त्यांची काळजी घेणारे परिचर व परिचारिका, समाजसेवक असा शेकडोजण कर्मचारी वर्ग असल्यामुळे त्यांचा दैनंदिन खर्च हा तीनशे रूपयापेक्षा अधिक आहे.

## भिक्षेकऱ्यांचा दैनंदिन खर्च ४२ रूपये

येरवड्यातील फुलेनगर येथील भिक्षेकरी स्वीकार केंद्रात शहरातील भिक्षेकऱ्यांना आणून ठेवले जाते. भिक्षा मागणे हा गुन्हा आहे. त्यामुळे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पोलीसांच्या मदतीने शहरातील भिक्षेकऱ्यांना स्विकार केंद्रात काही दिवस ठेवतात. तेथे प्रत्येक भिक्षेकऱ्यांचा दैनंदिन खर्च हा ४२ रुपये आहे. तर त्यांना दिवसाला पाच रूपये पगार दिला जातो.



# राज्यातील कारागृहातील शेती झाली आधुनिक



राज्याच्या विविध कारागृहातील कारखान्यांमध्ये कैद्यांची 'सुधारणा व पुनर्वसन' अंतर्गत कैद्यांना विविध उद्योगात गुंतवून ठेवले जाते. यामध्ये हातमाग, यंत्रमाग, सुतारकाम, चर्मकला, लोहारकाम आदी कामे दिली जातात. राज्यातील कारागृहाची शेती आता आधुनिक झाली आहे. त्यामुळे फलोत्पादन, भाजीपाला, फळभाज्या, मत्स्यशेतीचे उत्पन्न वाढणार आहे. कैद्यांची 'सुधारणा व पुनर्वसन' हे कारागृहाचे ब्रीद वाक्य आहे. राज्यातील ४७ कारागृहांपैकी नऊ मध्यवर्ती कारागृहे, नऊ खुली कारागृहे, एक महिला कारागृहात कैद्यांनी विविध उद्योगात गुंतवून ठेवले आहेत. यामध्ये येरवडा, नाशिक, नागपूर कारागृहाच्या कारखान्यात हातमाग, यंत्रमाग, सुतारकाम, चर्मकला, लोहारकाम, बेकरी, रसायन उद्योग सुरू आहेत. पुरुष सिद्धदोष कैदी ७० टक्के असून, महिला सिद्धदोष ८० टक्क्यांच्या पुढे आहेत. कारखान्यातील लाकडी फर्निचर, देव्हारे, किचन, सतरंजी, टॉवेल, बेडशीट आदी वस्तूंना मोठी मागणी आहे. अनेक लाकडी टेबल, खुर्च्या, छपाई, पुस्तक बांधणी आदींना सरकारी कार्यालयांमध्ये पुरवठा केला जातो. त्यामुळे वर्षभर कैद्यांना काम असते. त्यामुळे विविध कामात गुंतलेल्या अर्धकुशल, कुशल कैद्यांना कारागृह प्रशासनाच्या नियमाप्रमाणे पगार दिला जातो. या पैशाचा वापर ते स्वत:साठी करून कुटुंबाला देखील पाठवतात. त्यामुळे कैद्यांची सुधारणा व पुनर्वसन हा उद्देश सफल होत आहे.

आधुनिक कृषी अवजारे व यंत्रांची खरेदी कारागृहासाठी बोअरवेल, विद्युत मोटार, कल्टीव्हेटर, पेरणी यंत्र, चारा यंत्र अशी पाच लाख ९३ हजार रुपयांची कृषी अवजारे व उपकरणे खरेदी केली आहेत. नाशिक खुल्या कारागृहासाठी विद्युत पंप, नागपूर खुल्या कारागृहासाठी उच्च क्षमतेचे विद्युत पंप, मोर्शी खुल्या कारागृहासाठी ७५ हजार रुपयांचे कल्टीव्हेटर, बुलढाणा जिल्हा कारागृहासाठी स्प्रिंकलर, पेरणी यंत्र तर येरवडा खुल्या कारागृहासाठी विद्युत पंप, डबल पल्टी नांगर, ॲटोमॅटीक फर्टिलायझर सीड ड्रिल असे ३ लाख २९ हजार रुपयांची उपकरणे खरेदी केलेली आहेत. यासह विसापूर, कोल्हापूर, रत्नागिरी या खुल्या कारागृहासाठी आधुनिक कृषी उपकरणे व यंत्रे खरेदी केली आहेत. त्यामुळे या वर्षी कारागृहाच्या शेतीधील उत्पन्न नक्कीच वाढणार आहे.

### शेतीतील उत्पन्नही कोट्यवधी रूपयांचे

येरवडा, पैठण आदी ठिकाणी शेकडो एकर शेती आहे. यामध्ये गहू, तांदूळ, ज्वारी, विविध कडधान्ये, सोयाबीन, फळे, ऊस, पालेभाज्या, फळभाज्या, गायी, म्हशी पालन, मत्स्यशेतीसह सेंद्रिय खतनिर्मिती केली जाते. या कृषी उत्पनाचा उपयोग कारागृहात असलेल्या कैद्यांसाठी होतो. राज्यातील कारागृहातील शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची खरेदी केली जाणार आहे. यासाठी राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात १७ लाख १६ हजार रुपयांची उपकरणे खरेदी केलेली आहेत.

# ३४ हजार जणांना टेली मानस द्वारे समुपदेशन



मानसिक आजारावर 'टेली मानस' व्दारे तीन लाख जणांना समुपदेशन टोल फ्री क्रमांक १४४१६ वर ७० टक्के पुरूषांनी तर ३० टक्के महिलांनी घेतले समुपदेशन निद्रानाश, ताणतणाव व नैराश्यामुळे मानसिक आजार देशभरात कोरोना नंतर मानसिक आजारांचे रूग्ण वाढत आहेत. त्यामुळे केंद्रीय आरोग्य विभागाने 'टेली मानस' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत टोल फ्री क्रमांकावर फोन केल्यास त्यांना समुपदेशकाकडून समुपदेशन मिळते. राज्यातील येरवडा, ठाणे, नागपूर अशा तीन प्रादेशिक मनोरुग्णालयात तर बीड येथे 'टेली मानस' कॉल सेंटर सुरू केले आहे. आता पर्यंत तब्बल तीन लाख जणांचे समुपदेशन केले आहे. यामध्ये ७० टक्के पुरूषांना तर ३० टक्के महिलांनी १४४१६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क केला. त्यांना मानसिक आजाराविषयी समुपदेशन केल्याची माहिती येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाचे अधिक्षक सुनिल पाटील यांनी दिली. पाटील म्हणाले '' लॉकडाऊनच्या काळात अनेकांना चिंता, नैराश्य व बेरोजगारीमुळे ताणतणाव निर्माण झाल्यामुळे मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे केंद्रीय आरोग्य विभागाने देशात 'टेली मानस' हा उपक्रम सुरु केला आहे. राज्यात चार ठिकाणी हा उपक्रम सुरु असून येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयात टेली मानसचे कॉलसेंटर सुरु केले आहे. यामध्ये वीस समुपदेशक चोवीस तास आणि सातही दिवस सेवा देत आहेत. यामध्ये सुरवातीला कॉलमध्ये रुग्ण किती गंभीर आजारी आहे याची माहिती मिळते. त्यामध्ये स्तर १ व स्तर २ अशी विभागणी केली आहे. स्तर एकमध्ये रुग्णाचा आजार सौम्य स्वरुपात असतो. तर स्तर दोन मध्ये रूग्णाला गंभीर स्वरुपात आजाराने ग्रासलेले असते. त्यामुळे अशा रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करुन उपचार घेणे क्रमप्राप्त असते.'' चार मनोरुग्णालयांची पाच हजार ७०० रुग्ण क्षमता आहे. त्यापैकी तीन हजार रुग्ण उपचार घेत आहेत. गेल्या सहा वर्षांत चारही रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागातून साधारत: बारा लाख रुग्णांनी औषधोपचार व समुपदेशन घेतले आहे. तर 'जिल्हा मानसिक आरोग्य अभियान' अंतर्गत ३४ जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात तीन लाखापेक्षा अधिकजणांनी औषधोपचार व समुपदेशन घेतले. अंतररुग्ण विभागात सव्वादोन लाख जणांवर उपचार केले. तर ७६ हजार १३८ जणांपर्यंत पोचून त्यांना औषधोपचार व समुपदेशन केले.




## पुण्यनगरीचे श्रावणबाळ अनिल सातव पाटील यांच्याकडून १२ हजार नागरिकांसाठी भव्य महाकाल दर्शन यात्रा

जनसेवेची अखंड परंपरा जपणारे पुण्यनगरीचे श्रावणबाळ अनिल सातव पाटील यांनी आतापर्यंत १२ हजार नागरिकांना मोफत उज्जैन महाकाल दर्शन घडवत समाजसेवेचे अनोखे उदाहरण निर्माण केले आहे. नागरिकांची बाबा महाकालांच्या दर्शनाची इच्छा पूर्ण व्हावी, याकरिता त्यांनी ही भव्य मोफत उज्जैन दर्शन यात्रा आयोजित केली.

या यात्रेअंतर्गत भाविकांना पुणे रेल्वे स्टेशनपर्यंत ने-आण, त्यानंतर स्पेशल रेल्वेद्वारे उज्जैनकडे प्रवास, तसेच उज्जैनमध्ये निवास व भोजनाची सर्व सोय अनिल सातव पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आली. विशेष म्हणजे भाविकांना फक्त महाकालांचे दर्शनच नव्हे, तर सभोवतालचा ऐतिहासिक व पवित्र परिसर देखील दाखविण्यात आला. यावेळी एका भाविकाने बोलताना सांगितले की, "यात्रेचे संपूर्ण आयोजन अत्यंत नियोजनबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने करण्यात आले होते.

ट्रेनमध्येही भोजनाची, चहा नाश्त्याची सोय, वैद्यकीय पथक व डॉक्टरांची प्रत्येकाकडे जाऊन प्रकृतीची विचारपूस व तपासणी करणे अशा सर्व सुविधा पुरवून भाविकांचा संपूर्ण प्रवास अविस्मरणीय व आनंददायी करण्यात आला.

## मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी कायदेशीर पाऊल : प्री-लिटिगेशन कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे, दि. १६ :** मा सचिव,श्रीमती रेवती देशपांडे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि मा.वैदकीय अधिक्षक,प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज एमएचआरबी हॉलमध्ये मनोरुग्णांकरिता दाखलपूर्व प्रकरण शिबिर (Pre-Litigation Camp) आयोजित करण्यात आले. मनोरुग्णांच्या कायदेशीर प्रक्रियांना गती देणे, उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांच्या कौटुंबिक पुनर्वसनाला चालना मिळवून देणे आणि नातेवाईकांना मार्गदर्शन करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिराला मनोरुग्णांच्या नातेवाईकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कॅम्पमध्ये अनेक मनोरुग्णांच्या नातेवाईकांनी उपस्थित राहून रुग्णांना घरी परत घेऊन जाण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर व प्रशासकीय कार्यवाहीची माहिती जाणून घेतली. रुग्णालय प्रशासन आणि विधी तज्ज्ञांनी एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याने नातेवाईकांचा मोठा ताण हलका झाला. या मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी मदत करणाऱ्या समाज सेवा अधीक्षक विभागाचे यावेळी कौतुक करण्यात आले.

राज्य आरोग्य शिक्षण आणि संपर्क विभागाचे आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड, वरिष्ठ मनोविकृती तज्ज्ञ डॉ. शमा राठोड, अधिसेविका श्रीमती संगीता दुबे, समाजसेवा अधिक्षक विभाग प्रमुख श्री. मारुती दुनगे, कॅम्प कोऑर्डिनेटर श्री. भाऊसाहेब माने आणि श्रीमती स्मिता भोसले यांनी शिबिरामध्ये नातेवाईकांशी चर्चा केली आणि मार्गदर्शन केले. विधी तज्ज्ञ म्हणून ॲड. श्रीमती वैषाली जाधव, ॲड. श्रीमती पल्लवी शिंदे, ॲड. श्रीमती मधू हुकमानी यांनी रुग्णांच्या प्रकरणांची तपशीलवार माहिती घेऊन त्वरित कायदेशीर मार्गदर्शन केले.

हा उपक्रम रुग्णालयातून डिस्चार्जसाठी पात्र असलेल्या मनोरुग्णांना त्यांच्या कुटुंबात परत जाण्यासाठी एक महत्त्वाचे आणि संवेदनशील पाऊल असल्याचे मत नातेवाईकांनी व्यक्त केले. अशा कॅम्पमुळे उपचारानंतरचे पुनर्वसन अधिक सुलभ व प्रभावी होण्यास मदत होत असल्याचे प्रशासनाने सांगितले.







# चटकदार मिसळ अन् खमंग चर्चा!

## सुधीर वाघमोडेंचा 'मिसळ पे चर्चा' उपक्रम हिट

### मिसळ पे चर्चा'तून वाघमोडेंनी जाणून घेतल्या प्रभागातील समस्या; नागरिक, महिला, लहान मुले झाले सहभागी

**येरवडा, दि. १६ :** येरवडा परिसरातील प्रभाग क्रमांक दोन, नागपूरचाळ-फुलेनगर प्रभागातून ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले उमेदवार सुधीर वाघमोडे यांनी रविवारी एक आगळावेगळा उपक्रम राबवला. येरवडा पोस्ट ऑफिसजवळील 'सैराट मिसळ' या हॉटेलवर त्यांनी नागरिकांसाठी 'मिसळ पे चर्चा' या उपक्रमाचे आयोजन केले होते. वाघमोडे यांच्या या अनोख्या कल्पनेस नागरिकांनी भरभरून उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग घेतला.

**विकास आणि समस्यांवर चर्चा :** प्रभागातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि प्रभागाच्या विकासकामांची दिशा ठरवण्यासाठी वाघमोडे यांनी नागरिकांना मिसळ खाण्याचा आनंद घेत चर्चा करण्याचे एक हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. या चर्चेत पुरुष, महिला आणि लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. नागरिकांनी सुधीर वाघमोडे यांच्यासोबत मनमोकळेपणाने प्रश्न विचारून आणि समस्या मांडून चर्चा केली.

**चर्चेतील प्रमुख मुद्दे :** आरोग्य आणि सुरक्षा: नागरिकांचे आरोग्य, महिला व लहान मुलांची सुरक्षा याबद्दल खास करून चर्चा झाली.

**रस्ते आणि स्वच्छता :** प्रभागातील रस्त्यांची दुरवस्था हा महत्त्वाचा मुद्दा चर्चेत आला. काही नागरिकांनी रस्त्यावर उघड्यावर कचरा टाकल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार केली आणि त्यावर उपाययोजना करण्याची मागणी केली.

**रोजगार आणि मैदाने :** अनेक तरुण बेरोजगार असून त्यांच्यासाठी रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत तरुणांनी चर्चा केली. तर लहान मुलांनी त्यांना खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

**ज्येष्ठ नागरिकांची मागणी :** ज्येष्ठ नागरिकांनी प्रभागातील गार्डनची वेळ वाढवून मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सकाळच्या प्रसन्न वातावरणात, चटकदार मिसळीचा आस्वाद घेत नागरिकांनी प्रभागाच्या विकासावर खमंग चर्चा केली. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल हजारो लोकांनी प्रतिसाद देऊन सुधीर वाघमोडे यांचे आभार मानले.

दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडन्स पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्रमांक २०–४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५, Email-mahametronews.pune@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
TC. MAHMAR51691 NO.SDM/PUNE/SR/56/2022 MAHA METRO RNI N0.MAHMAR2022/87390, This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# स्थायी समिती सभेत विविध विकासकामांच्या खर्चास प्रशासक श्रावण हर्डीकर यांची मान्यता

**पिंपरी, दि. १६ :** पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापालिका तसेच स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक श्रावण हर्डीकर दूरस्थ (ऑनलाईन)पद्धतीने उपस्थित होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, विजयकुमार खोराटे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

स्थायी समिती सभेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात नाट्य प्रशिक्षण उपक्रम राबविणे, इ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. ५ गवळीनगर व इतर परिसरातील सेवा वाहिन्या टाकलेल्या ठिकाणचे रस्ते पेव्हिंग ब्लॉक टाकून सुधारणा करणे व अनुषंगिक कामे करणे, येथील रस्त्यांची एम. पी. एम. व हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करणे आणि इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासक हर्डीकर यांनी मान्यता दिली. तर प्रभाग क्र. ३ चऱ्होली, प्रभाग क्र. ४



बोपखेल, प्रभाग क्र. ५, प्रभाग क्र. ७ परिसरातील विविध ठिकाणची स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे व प्रभागातील अनुषंगिक कामे करणे तसेच प्रभाग क्र. ५ मधील डांबरी रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत मामुर्डी सर्वे नं. ४ मधील आ. क्र. ४/१६४ खेळाचे मैदान येथे सीमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ९ मधील महापालिकेच्या विविध कार्यक्रमांकरिता मंडप व्यवस्था करणे तसेच प्रभाग क्र. २ जाधववाडी येथील कचरा संकलन केंद्र व परिसरातील डांबरीकरण व प्रभाग क्र. २ मधील चिखली कुदळवाडी येथील परिसरात स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली. तर महापालिकेच्या आरोग्य विभागासाठी डिओडरंट कम डिसइन्फेक्टंट खरेदी करणे, स्थायी समिती सभागृह येथे व्हिडीओ स्प्लिटर बसविणे या विषयांना देखील मान्यता देण्यात आली.

याव्यतिरिक्त, इ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ५ मधील गणेश कॉलनी व इतर परिसरातील व प्रभाग क्र. ३ मोशी येथील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास स्थायी समिती सभेत मान्यता देण्यात आली. याशिवाय, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ४ दिघी परिसरात विविध ठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्ती विषयक कामे करणे, ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २ चिखली येथील रस्त्याचे एम. पी. एम. पद्धतीने डांबरीकरण करणे तसेच प्रभाग क्र. २ मोशीमधील परिसरात महापालिका इमारतींची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २२ काळेवाडी येथील विविध ठिकाणी स्टॉर्म वॉटर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २ मोशी परिसरात एम. पी. एम. पद्धतीने रस्त्यांचे डांबरीकरण करणे व महापालिका शाळा, दवाखाना यांची देखभाल-दुरुस्तीची स्थापत्य विषयक कामे करणे यासह विविध विषयांना येणाऱ्या खर्चास आयुक्त हर्डीकर यांनी यावेळी मंजुरी दिली.

## राज्य निवडणूक आयोगाच्या नियमानुसार नि:पक्षपातीपणे कामकाज करा - आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर

**पिंपरी, दि. १६ :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक कामासाठी नियुक्त सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परस्पर उत्तम समन्वय ठेवून आपली जबाबदारी पार पाडावी. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या नियमावलीनुसार अत्यंत जबाबदारीने पारदर्शक आणि नि:पक्षपातीपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडावी, अशा सूचना आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिल्या.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आढावा बैठक आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली,त्यावेळी ते बोलत होते. आयुक्त हर्डीकर म्हणाले, प्रत्येक प्रभागातून ४ उमेदवार निवडून द्यायचे असून, प्रत्येक मतदाराला ४ उमेदवारांना मतदान करण्याचा अधिकार असणार आहे. याच पद्धतीने ईव्हीएमची रचना आणि इतर तांत्रिक बाबींचे नियोजन असणार आहे. मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असल्याने त्यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया सर्वांसाठी अत्यंत संवेदनशील असणार असून शहरात सुमारे १७ लाख मतदार असून त्यांच्या नियोजनासाठी ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये निश्चित करण्यात आली आहेत. कामात सुसूत्रता आणण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर योग्य मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मतदारांच्या सोयीसाठी नव्याने काही मतदान केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. प्रभागातील मतदान केंद्र त्याच प्रभागात राहतील याची काळजी घेणे आवश्यक आहे.

# नॉव्हेल विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**पिंपरी, दि. १६ :** पिंपरी-चिंचवड येथील नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूलतर्फे दिनांक 10 आणि 11 डिसेंबर 2025 दरम्यान प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात वार्षिक स्नेहसंमेलनाचा भव्य व आकर्षक कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात

आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांच्या कार्यक्रमांनी उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.कार्यक्रमाचे दोन सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले होते. 10 डिसेंबर 2025 रोजीच्या पहिल्या सत्राच्या प्रमुख

पाहुण्या म्हणून धनश्री हॉस्पिटलच्या सर्जन डॉ. सलोनी पटवर्धन उपस्थित होत्या. तर 11 डिसेंबर 2025 रोजीच्या दुसऱ्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध पार्श्वगायिका सावनी रविंद्र यांनी उपस्थित

राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या स्नेहसंमेलनाला नॉव्हेल




ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष माननीय आमदार अमित गोरखे,कार्यकारी संचालक श्री. विलास जेऊरकर, माजी नगरसेविका सौ. अनुराधाताई गोरखे, विद्यालय व्यवस्थापक डॉ. प्रिया गोरखे, तांत्रिक विभाग प्रमुख श्री.समीर जेऊरकर, मुख्याध्यापिका सौ. मृदुला गायकवाड,पालक संघाचे प्रतिनिधी, विद्यार्थी-पालक आणि शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

यावर्षी स्नेहसंमेलनाची "Legends of India" ही थीम विशेष आकर्षण ठरली. देशातील अजरामर महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, गायन, वादन अशा विविध सांस्कृतिक

सादरीकरणांतून अत्यंत प्रभावीपणे साकारला. नॉव्हेल विद्यालयातील विद्यार्थ्यांची सर्वांगीण कलात्मक प्रगती पाहून पालकांनी उत्स्फूर्तपणे कौतुकाची दाद दिली.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी नॉव्हेल विद्यालयात वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. विद्यालयाचे संस्थापक माननीय आमदार अमित गोरखे आणि मुख्याध्यापिका सौ. मृदुला गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्जनशील कार्यक्रमांची अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ

करण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला जातो. या कार्यात विद्यालयाचे विश्वस्त, पालक आणि कर्मचारी वर्ग यांचेही मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे प्रशासनाने सांगितले.

# पाकिस्तान वरील १९७१ चा विजय हे इतिहासातील सोनेरी पान

**पुणे, दि. १६ :** भारत आणि पाकिस्तान दरम्यान सन १९७१ च्या युद्धात पाकिस्तानवर मिळवलेला विजय म्हणजे भारतीय लष्कराच्या इतिहासातील सोनेरी पान असल्याचे प्रतिपादन युद्धात सहभागी झालेल्या अनुभवी वीरसैनिकांनी केले.

या युद्धातील विजयादिनानिमित्त लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाच्या वतीने आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दक्षिण मुख्यालयातील सर्व प्रमुख अधिकारी व या युद्धात सहभाग घेतलेले निवृत्त अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांनी शहिदांचे स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

या युद्धाने बांगलादेश या स्वतंत्र देशाची निर्मिती झाली. भारतीय




लष्कराच्या शौर्याबरोबरच सामरिक रणनीतीमुळे उभ्या जगाला स्तिमित करून टाकले. पाकिस्तानचे तब्बल एक लाख सैनिक शरण आले. भारतीय लष्कराकडून या शरणार्थी शत्रू सैनिकांनाही सन्मानाची वागणूक दिली गेली असे सन्मानियांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले.

या कार्यक्रमानंतर सर्व युद्धविरांचा लेफ्टनंट जनरल धीरज सेठ (आर्मी कमांडर - दक्षिण कमांड) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मा.कर्नल न्यायपती यांनी या ऐतिहासिक युद्धात सहभाग घेऊन देशासाठी महत्वाची कामगिरी निभावली. लष्करात सेवा करून निवृत्त झाल्यानंतर ते विश्रांती रुग्णालयाच्या माध्यमातून जनसामान्य रुग्णांना अविरत वैद्यकीय सेवा गेल्या बत्तीस वर्षांपासून देत आहेत. आपल्या केअर इंडिया मेडिकल सोसायटी या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून गोर गरीब रुग्णांना कर्करोगाची मोफत सेवा प्रदान करीत आहेत.विशेषतः केमोथेरपीसारखे उपचार मोफत उपलब्ध करून दिले जात आहेत.या त्यांच्या सत्कार्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# पुण्यात सचिन सातपुते यांच्या लाडकी बहीण ओवाळणी योजनेला प्रचंड प्रतिसाद

**पुणे, दि. १६ :** महाराष्ट्र राज्यातील बिगर शासकीय असणारा पहिला आणि एकमेव असा उपक्रम,पुण्यातील वडगाव शेरी चंदन नगर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व सचित सातपुते फाउंडेशन चे संस्थापक सचिन सातपुते यांच्या लाडकी बहीण ओवाळणी योजनेला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे .एकीकडे शासकीय लाडकी बहीण योजनेच्या अटी वाढत अस्तताना सचिन सातपुते यांनी मात्र परिसरातील तब्बल 2500 महिलांना दरमहा 1000 हजार रुपये देणारी लाडकी बहीण ओवाळणी योजना सुरू केली असून ती योजना महिलामध्ये अतिशय लोकप्रिय होताना दिसून येत आहे .

सचिन सातपुते यांनी रक्षाबंधनाच्या दिवशी या योजनेचा शुभारंभ केला असून 2500 महिलांचा त्यांचा संकल्प जवळजवळ पूर्णत्वास येत असल्याचे त्यांनी नुकतेच जाहीर केले आहे




.राज्यातील आणि देशातील हा खाजगी व सामाजिक स्तरावर चालणारा पहिला आणि एकमेव उपक्रम असल्याचा सातपुते यांनी दावा केला आहे .तसेच भविष्यात हा उपक्रम पुणे शहर आणि जिल्हा स्तरावर राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे .



**जयश्री राजेंद्र सातव पाटील माजी सरपंच ग्रामपंचायत वाघोली यांना नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय उत्कृष्ट सामाजिक कार्य केल्याबद्दल पुरस्कार मिळाला त्याबद्दल समस्त वाघोली व लोहगावकरांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले**

## पर्वती नागरिक कृती समितीच्या वतीने साहित्य परिषद टिळक रोड पुणे येथे कार्यक्रम

**पुणे, दि. १६ :** पर्वती नागरिक कृती समितीच्या वतीने साहित्य परिषद टिळक रोड पुणे येथे कार्यक्रम नुकताच पार पडला पूजा घाटकर, अरुण रोडे, चंद्रशेखर बेगमपुरे, विलास बाबर, मिलिंद शिरसागर,यांना पर्वती भूषण देऊन सन्मान करण्यात आले.

ज्येष्ठ साहित्यिक शाम भुरके यांच्या हस्ते आणि सामाजिक कार्यकर्त्या श्रेया पाठक यांच्या उपस्थित पुरस्काराचे वितरण झाले झाला संजय जोग, राजेंद्र देव,संजय कारंडे, अनघ लक्ष्मी दुर्गा, मीनाक्षी आपटे, यांना पर्वती भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले तर आस्था मोरे, साक्षी कांबळे,डॉ. ज्योती भोसले, डॉ.अर्चना जोशी दीपक शिंदे,अश्विनी गडे, यांना पर्वती गौरव पुरस्कार आले तसेच उत्कृष्ट गणेश उत्सव साठी पाच गणेशोत्सव मंडळाना प्रमाणपत्र सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले व घरगुती गणेशोत्सव स्पर्धेसाठी सुप्रिया तांबट व उत्कृष्ट केल्यासाठी




पुरस्कार पठाडे परिवार देण्यात आला संयोजक शारदा सरोदे, संजय बिबवे, संजय काळोखे, अलका कांबळे, चारोशीला रौंदळे, घनश्याम खलाटे,तसेच प्रास्ताविक व स्वागत शेखर कोरडे यांनी केले तानाजी शिरोळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## "गोपीनाथराव मुंडे साहेब" संवेदनशील, कार्यकर्त्यांची जाण असणारे लोकनेते - संदीप खर्डेकर

**पुणे, दि. १६ :** गोपीनाथराव मुंडे साहेब हे अत्यंत संवेदनशील व कर्यकर्त्यांची जाण असलेले महाराष्ट्राचे लोकनेते होते, त्यांच्या अकाली जाण्याने असंख्य कार्यकर्त्यांचे आणि राज्याचे अतोनात नुकसान झाले असे भाजपा चे प्रवक्ते संदीप खर्डेकर म्हणाले. सामान्य नागरिकांच्या आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा नेता अशी त्यांची ओळख होती, त्यांचा जीवनप्रवास हा संघर्षाने भरलेला होता असेही खर्डेकर म्हणाले. मा. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या ७६ शहात्तर व्या जयंती निमित्त क्रिएटिव्ह फाउंडेशन च्या वतीने विविध संस्थांना लोकोपयोगी साहित्य भेट देण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी क्रिएटिव्ह फाउंडेशन च्या विश्वस्त व मा. नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, शनी मारुती मंदिराचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते दीपक निकम, प्रभाग २९ च्या भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष संगीताताई आधवडे,क्रिएटिव्ह फाउंडेशन चे विश्वस्त प्रतीक खर्डेकर,अलंकार दत्त मंदिराच्या प्रमुख विश्वस्त रजनी जोशीराव,चंद्रकांत भिसे,रंजिता आरेकर,अरविंद परांजपे,दिलीप शिवणेकर,हनुमंत कट्टीमणी,कानिफनाथ मित्र मंडळाचे गोकुळ काळे, प्रमोद काळे, अमित बारमुख, दीपक कदम,भजनी मंडळाच्या शितल म्हसकर,विद्या ननावरे,इंदुमती गोसावी,पुष्पा पाडेकर,सीमा जाधव,अर्चना ननावरे,शर्मिला जगताप,ममता भारती,मालती चिंचवडे,जिमन,सत्यभा मा बांदल, स्वाती साळुंके,मलिक्का पवार, अनिकेत काळे, बाब्या पेंढारे, संगीता साळुंके इ मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंजुश्री खर्डेकर यांच्या हस्ते खुर्च्या, सतरंजी, स्पीकर सेट व इतर साहित्य भेट देण्यात आले. गोपीनाथ मुंडे साहेब यांनी राज्यभर भारतीय जनता पार्टीच्या कार्यविस्तारा साठी झोकून देऊन काम केले, सर्व पातळीवर



संघर्ष केला आणि त्यामुळेच आज भाजपा ला सोनेरी दिवस बघायला मिळत आहेत असे मंजुश्री खर्डेकर म्हणाल्या. "साहेबांनी" प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय द्यायचा प्रयत्न केला व ते केवळ बहुजनांचे नव्हे तर सर्वच जाती धार्मियांचे नेते होते असे संदीप खर्डेकर म्हणाले.साहेबांच्या निधनाला इतकी वर्ष झाली तरी त्यांच्या आठवणी आणि अस्तित्व पुसलं जात नाहीये असे त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्व होते असेही संदीप खर्डेकर म्हणाले. त्यांच्या जयंती दिनी त्यांनी दाखविलेल्या मार्गाने आम्ही वाटचाल करत असून जास्तीतजास्त लोकांना मदत करत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# लोकशाही बळकट करण्याचा संकल्प; शेकडो लाभार्थ्यांनी घेतली मतदानाची शपथ....

**पिंपरी, दि. १६ :**"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू", अशी मतदानाची शपथ मतदारांनी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत घेतली आणि येत्या महापालिका निवडणुकीत १०० % टक्के मतदान करण्याचा निर्धारही व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत डूडूळगाव येथे उभारलेल्या प्रकल्पातील १ हजार १९० सदनिका तसेच किवळे येथील आर्थिक दुर्बल घटकांच्या ७५५ सदनिकांचे पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर येथे संगणकीय सोडत झाली, यावेळी उपस्थित विजेते लाभार्थी, महापालिका अधिकारी, कर्मचारी यांना मतदानाची शपथ देण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, सीओईपीचे विभागप्रमुख डॉ. सुधीर आगासे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, सहाय्यक आयुक्त डी. डी. कांबळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तसेच मतदान शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.



# झाडांची लायब्ररी ११९ प्रजातींची ५१५ रोपटी

**पुणे, दि. १६ :** वनस्पती लागवडीसाठी एक आराखडा तयार केला असून एक एकर जागेत ( २०० फूट लांबी व २०० फूट रुंदी) १० बाय १० अंतरावर ग्रीड ( चौरस आकाराचा खण )घेणे असे साधारणत: ४०० ग्रीडस होतात.मध्यभागी २० बाय बाय२० फुटांचे बांबूचे झोपडे बांधले.शेजारी २० बाय २० फुटाची पाण्याचा तलाव करणे , प्रत्येक ग्रीडमध्ये एक रोपटे लावणे.साधारणत: एकमेका शेजारील चार ग्रीडमध्ये ४ सारख्या प्रकारची रोपे लावणे. म्हणजे भविष्यात ही चार रोपे एकमेकांच्या सहवासात चांगली वाढतात. अशी ११९ प्रजातीची स्थानिक ,देशी लहान मोठी झाडे,वेली, झुडूप सुमारे ५१५ रोपटी लावल्याने त्यांची वाढ योग्य होईल. अशी रोपांची निवड करून लागवड केली जाते.त्यासाठी ड्रीप आठवड्या तीन वेळा सुरुवातीस अर्धा तास पाणी देणे, संरक्षणासाठी कुंपण करणे, अथवा चर घेणे. अशा मानव निर्मित देवराईचे अनेक फायदे आहेत.त्यातील महत्वाचे काही खालील प्रमाणे

१)झाडाची लायब्ररी ( ग्रंथालय ) तयार होते. जशी पुस्तके वेगवेगळया खणात ठेवली जातात. त्याचा एक नकाशा असतो. त्या ठिकाणा प्रमाणे प्रत्येक जण त्या खणात जाऊन वाचू शकतो तसेच झाडांचे सुद्धा प्रत्येक ग्रीडला क्रमांका नुसार रोपांची रचना व लागवड केल्यामुळे झाड वाचू शकते.त्याचे खोड, पान, फुल, फळ ते पाहून वाचू शकतो. आता झाडे कागदावर न वाचता प्रत्यक्षात वाचली गेली तर त्या झाडाविषयी आत्मीयता निर्माण होईल वृक्ष लागवडीच्या संवर्धनाला चालना मिळेल

२)Seed Bank या देवराईत आपल्याला लाखो बिया मिळतील त्यापासून कायम स्वरुपाची दरवर्षी बिया मिळून संपूर्ण जिल्ह्यातील वृक्ष लागवडीसाठी रोपे तयार डोऊ शकतील. ३)Seeddisposalहवेमार्फत पक्षामार्फत, मधमाशा, फुलपाखरांमार्फत लाखो बियांचे प्रसरण होऊ अनेक बिया रूजून पूर्वी सारखी जंगल निर्माण होण्यास मदत होईल.

४)सदर देवराईत पॉझिटीव्ह (+) एनर्जी ७५० असल्यामुळे(इतरत ठिकाणी साधाणत: ३५० असते.) त्या देवराईत ध्यान (Meditation )करू शकतो.वाढदिवस साजरे करणे, बारसे करणे, गाव बैठक घेणे इत्यादी प्रकारे उपयोग होऊ शकतो. कृषी प्रर्यटन केंद्रासाठी हा एक अभिनव प्रकल्प आहे. तसेच देवराई एक प्रकारची oxygen Bankहोऊ शकते. अनेक सजीवांना आश्रय स्थान मिळेल, कायमस्वरूपी अन्न-पाण्याची सोय होऊ शकते. मातीची धूप थांबते. हवेतील प्रदूषीत धुलीकण रोखण्यास मदत होते. अशी ही मानव निर्मित देवराई ही काळाची गरज असून वृक्ष लागवडीस एक प्रकारची दिशा देणारी दिशादर्शक देवराई आहे. ज्यांना कोणाला वैयक्तिक अथवा गावपातळीवर देवराई उभारायची असेल त्यांना रोप लागवडी आराखडा(plan )व रोपे विनामूल्य दिली जातील . तसेच संपूर्ण मार्गदशन केले जाते.

आता पर्यंत महाराष्ट्रात व महाराष्ट्रा बाहेर ३६ देवराया उभ्या राहिल्या आहेत. त्यात रोपांचे जगण्याचे प्रमाण ९९ टक्के पर्यंत आहे. देवराया करण्याचा मानस असल्याचे देवराई फाऊंडेशनचे रघुनाथ ढोल यांनी सांगितले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती

**पिंपरी, दि. १६ :** राज्य निवडणूक आयोगाकडून महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम १५ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने ३२ प्रभागातील १२८ जागांसाठी निवडणूक होणार असून १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी ८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २४ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर याच्या स्वाक्षरीने याबाबतचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने निवडणूक पार पडत असून चार सदस्यीय प्रभागरचना असणार आहे. चार प्रभागांकरीता १ असे एकूण ८ निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सहाय्यक म्हणून ३ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कामकाज पाहणार आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोग, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, निवडणूक विभागाचे उपायुक्त तथा नोडल अधिकारी यांच्या सूचना व आदेशानुसार तसेच महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार निवडणुकीचे सर्व कामकाज काटेकोरपणे पार पाडावे, असे देखील आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**प्रभागनिहाय नियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी**

प्रभाग क्रमांक १०, १४, १५ व १९ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पल्लवी घाटगे (उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ४, पुणे ) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अविनाश डोईफोडे, निवेदिता घार्गे, वैशाली ननावरे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, प्राधिकरण, निगडी येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून हणुमंत पाटील (उपजिल्हाधिकारी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रवींद्र कुलकर्णी, राजाराम सरगर, चंद्रकांत मुठाळ यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय ब क्षेत्रीय कार्यालय, लिंक रोड, एल्प्रो मॉलच्या मागे, चिंचवडगाव येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक २, ६, ८ व ९ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून हिम्मत खराडे (उपजिल्हाधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अजिनाथ गजरे, सुनिलदत्त नरोटे, दशरथ कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय क क्षेत्रीय कार्यालय, पॉलिग्रास हॉकी स्टेडियमजवळ, एमआयडीसी, भोसरी येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक २५, २६, २८ व २९ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अनिल पवार (उपजिल्हाधिकारी, विभागीय कार्यालय, सारथी) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महमंद पाप्पा सय्यद, आश्विनी गायकवाड, सुनिल शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय ड क्षेत्रीय कार्यालय, औंध–रावेत बीआरटी रोड, रहाटणे येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक ३, ४, ५ व ७ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दिप्ती सूर्यवंशी (उपजिल्हाधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रविण ढमाले, तानाजी नरळे, सुर्यकांत मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय कबड्डी प्रशिक्षण संकुल, अंकुशराव लांडगे नाट्यगृहाच्या मागे, भोसरी येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नितीन गवळी (उपजिल्हाधिकारी, प्रादेशिक औद्योगिक अधिकारी) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मनिषा बोबले, अतुल पाटील, शिवाजी चौरे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय सेक्टर १७/१९, स्पाईन रोड शेजारी, घरकुल चिखली टाउन हॉल येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ साठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सुप्रिया डांगे (उपजिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून हरिदास चाटे, विजय सोनवणे, हेमंत देसाई यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय ग क्षेत्रीय कार्यालय, वेंगसरकर अकादमीच्या मागे, थेरगाव येथे असणार आहे.

प्रभाग क्रमांक २०, ३०, ३१ व ३२ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अर्चना पठारे (उपजिल्हाधिकारी, प्रादेशिक औद्योगिक अधिकारी) यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून गौरी तेलंग, सतिश वाघमारे, सोहन निकम यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय मनपाचे कासारवाडी भाजी मंडई (दुमजली हॉल), शास्त्रीनगर, कासारवाडी येथे असणार आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या डूडूळगाव येथील १ हजार १९० सदनिका तसेच किवळे येथील ७५५ सदनिकांची संगणकीय सोडत जाहीर

**पिंपरी, दि. १६ :** पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे, त्यांना चांगले घर मिळावे तसेच झोपडपट्टीविरहित शहर असावे, यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्यातून शहरातील प्रत्येक गरजू व बेघरांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका अग्रेसर आहे. आज प्रधानमंत्री आवास योजनेतील डूडूळगाव येथील व आर्थिक दुर्बल घटकांच्या किवळे प्रकल्पांतील सदनिकांची संगणकीय सोडत काढण्यात आली आहे. या सोडतीमध्ये निवड झालेल्या नागरिकांचे शहरातील स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत डूडूळगाव येथे उभारलेल्या प्रकल्पातील १ हजार १९० सदनिका तसेच किवळे येथील आर्थिक दुर्बल घटकांच्या ७५५ सदनिकांचे पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते संगणकीय सोडत झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते सोडतीमध्ये विजेत्या सदनिका लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात पत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, सीओईपीचे विभागप्रमुख डॉ. सुधीर आगासे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, माजी नगर सदस्य सागर आंघोळकर, सहाय्यक आयुक्त डी. डी. कांबळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार जगताप पुढे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहर हे देशात सातव्या व राज्यात पहिल्या क्रमांकाचे राहण्यायोग्य शहर म्हणून नावारूपास आले आहे. या शहरात आपले स्वतःचे हक्काचे घर असावे, असे स्वप्न प्रत्येकाचे असते. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून पिंपरी चिंचवड महापालिका नागरिकांचे हे स्वप्न पूर्ण करीत आहे. सदर सोडत पारदर्शक पद्धतीने करण्यात आली आहे. आजच्या सोडतीत घर न मिळाल्यास नागरिकांनी निराश होऊ नये. तर त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना २.० साठी अर्ज करावा, असे आवाहन देखील त्यांनी केले.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी प्रास्ताविक केले. तर उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सदर योजनेबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार उपायुक्त बोदडे यांनी मानले.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत डूडूळगाव येथील १ हजार १९० सदनिका तसेच किवळे येथील ७५५ सदनिकांच्या संगणकीय सोडतीमध्ये विजेते ठरलेल्या लाभार्थ्यांची यादी महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांना पाहण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
> — अण्णा बोदडे,
> उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून इच्छुक उमेदवारांसाठी ऑनलाईन 'ना हरकत दाखला' प्रणाली सुरू

**पिंपरी, दि. १६ :** पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरताना महापालिकेकडून आवश्यक असलेला ना हरकत दाखला सुलभरीत्या मिळावा, यासाठी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर विशेष ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या या सुविधेमुळे इच्छुक उमेदवारांना आता घरबसल्या ना हरकत दाखल्यासाठी अर्ज दाखल करता येणार आहे. अर्ज सादर करताना उमेदवारांना ओळखपत्र म्हणून आधार कार्ड क्रमांक आणि आवश्यक वैयक्तिक माहिती भरावी लागणार आहे. या प्रणालीमुळे संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि सोप्या पद्धतीने पार पाडता येणार आहे. अर्ज प्रक्रिया समजून घेण्यासाठी उमेदवारांना मदत व्हावी, यासाठी संकेतस्थळावर क्रमाक्रमाने अर्ज कसा करावा याबाबतचा माहितीपूर्ण व्हिडीओ देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

याशिवाय महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रारूप मतदार यादी, मतदार यादीतील संभाव्य दुबार नावे, आरक्षण सोडत माहिती, अंतिम प्रभाग रचना तसेच प्रारूप प्रभाग रचना यासंबंधीची सविस्तर माहिती देखील नागरिक आणि उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



## ना हरकत प्रमाणपत्रासाठी असा करा अर्ज...

- अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.
- सदर संकेतस्थळावर 'मनपा सार्वत्रिक निवडणूक' या पर्यायावर क्लिक करावे.
- त्यानंतर 'उमेदवारांसाठी ना हरकत दाखला प्रणाली' या पर्यायामधून ऑनलाईन अर्ज सादर करावा.